# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

( विद्या विभाग )

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २२३३२३

गोविग/विद्या/क्र४९ /२०२१ दि. ०६/०७/२०२१

## परिपत्रक

**विषय :– UPSC Civil Service चे मोफत प्रशिक्षणाबाबत.**

**संदर्भ :– उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय, मुंबई यांचे दि.२९/०६ /२०२१ चे पत्र**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, केंन्द्रीय लोकसेवा आयोगाकडून (नागरी सेवा) घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी राज्यातील विद्यार्थ्यांच्या सहभाग वाढावा, हा दृष्टिकोन ठेवून उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राज्यामध्ये सहा Pre IAS प्रशिक्षणे केंन्द्र कार्यरत आहेत. गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांने आपली पदवी पुर्ण केलेली आहे अथवा जे विद्यार्थी पदवीच्या अंतिम वर्षाला आहेत असे विद्यार्थी संस्थेकडून मोफत प्रशिक्षणासाठी घेण्यात येणारी चाळणी परीक्षा देउ शकतात.

करीता विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्य/प्राध्यापक/विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेण्यासाठी दिनांक १९ जुन, २०२१ ते १८ जुलै, २०२१ दरम्यान ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी. तसेच नोंदणी करीता आणि अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी www.svpias.com या संकेतस्थळावर भेट दयावी.

(डॉ. दिपक जुनघरे)
उपकुलसचिव (विद्या)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

जा.क्र./मंत्री.उ.व.तं.शि./टिप्पणी/८८० /२०२१
दिनांक:-

मंत्री
उच्च व तंत्रशिक्षण
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

मंत्री
महाराष्ट्र राज्य

दिनांक : 29 JUN 2021

**विषय : UPSC CIVIL SERVICE चे मोफत प्रशिक्षणाबाबत.**

केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून (नागरी सेवा) घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी राज्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा हा दृष्टिकोन ठेऊन उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राज्यामध्ये सहा Pre – IAS प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत. त्यांची प्रवेश क्षमता मर्यादित आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्यात अनेक संस्था कार्यरत आहेत. शिवविद्या प्रबोधिनी पब्लिक ट्रस्ट ही एक स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असणारी संस्था आहे. गेली दोन दशकं झाली संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देण्याचं काम सुरू आहे. सामाजिक बांधिलकी जपत संस्था कार्यरत आहे. शिवविद्या प्रबोधिनी पब्लिक ट्रस्ट, बाळासाहेब ठाकरे आयएएस अकॅडमी एक वर्ष कालावधीचे 1000 विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देते.

ज्या विद्यार्थ्यांनी आपली पदवी पूर्ण केली आहे अथवा जे विद्यार्थी पदवीच्या अंतिम वर्षाला आहेत असे विद्यार्थी संस्थेकडून मोफत प्रशिक्षणासाठी घेण्यात येणारी चाळणी परीक्षा देऊ शकतात. आपल्या महाविद्यालयातील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेण्यासाठी दिनांक 19 जून 2021 ते 18 जुलै 2021 दरम्यान ऑनलाईन नोंदणी करावी. नोंदणी करण्यासाठी आणि अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी www.svpias.com या संकेतस्थळास भेट द्यावी.

ही परीक्षा पात्र ठरणाऱ्या पहिल्या 1000 विद्यार्थ्यांना तज्ञ प्राध्यापकांकडून ऑनलाईन मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या सुविधेचा अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन संस्थेने केले आहे. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ घेण्यासाठी आपण त्यांना या उपक्रमात सहभागी करावे. तसेच महाराष्ट्रातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची भारतीय प्रशासकीय सेवेत निवड होईल, हि अपेक्षा.

(उदय सामंत)

प्रति,
**मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे**
**मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई**
**मा. कुलगुरु सर्व अकृषि विद्यापीठे**